**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक ०४ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार.
2. दहशतवादाविरुद्ध भारताचं धोरण स्पष्ट करण्यासाठी विविध देशांना भेट देण्यासाठी गेलेल्या ४ बहुपक्षीय शिष्टमंडळांचा दौरा पूर्ण.
3. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरेल असा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास.
4. विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता.

---

**पावसाळी अधिवेशन**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २१ जुलैपासून सुरु होणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संसदीय कामकाज समितीची बैठक अध्यक्ष राजनाथ सिंग यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत झाली. त्यानंतर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी वार्ताहरांना ही माहिती दिली. हे अधिवेशन येत्या १२ ऑगस्टपर्यंत चालेल.

(होल्ड बाईट  किरेन रिजिजु  - १३ सेकद)

मानसून सेशन का तिथि हमने तय किया है। हम राष्ट्रपति जी को प्रपोजल भेजेंगे। समन करने के लिए 21 फर्स्ट जुलाई से 12 अगस्त तक मानसून सेशन को चलाने का हमने डेट तय किया है।

त्यात सर्व विषयांवर चर्चा शक्य आहे असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन घेण्याची मागणी काही काळ विरोधी पक्षांकडून होत होती. मात्र आता नियमित पावसाळी अधिवेशनाच्या तारखा जाहीर झाल्या असल्यानं विशेष अधिवेशनाची शक्यता मावळली आहे.

---

**ऊर्जा क्षेत्र**

मागील अकरा वर्षात देशातल्या ऊर्जा क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं असून जनतेला स्वच्छ आणि परवडण्याजोगी ऊर्जा मिळावी यासाठी  सरकार आग्रही आहे,

असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. सुधारणा, हरित ऊर्जा उपक्रम आणि स्वावलंबन यासाठी सरकारचा विशेष आग्रह असल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं. यासाठी त्यांनी पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या एका लेखाचा दाखला दिला. भारत जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था बनला आहे, तसंच एक धोरणात्मक शक्ति म्हणूनही उदयाला येत आहे, असं पुरी यांच्या या लेखात म्हटलं आहे. ऊर्जा क्षेत्र देशाच्या विकासासाठी महत्त्वाचं असून गेल्या दहा वर्षात केलेल्या कामाच्या पायावर या क्षेत्रात संरचनात्मक परिवर्तन झालं आहे, असं पुरी म्हणाले. पंतप्रधानांच्या दूरदर्शी नेतृत्वाखील देशाचं ऊर्जा क्षेत्र आत्मनिर्भर झाल्याचंही पुरी यांनी या लेखात म्हटलं आहे.

---------------------------------------------------

बहुपक्षीय शिष्टमंडळ

दहशतवादाविरुद्ध भारताने आपली भूमिका जगासमोर मांडण्यासाठी नियुक्त केलेल्या सात बहुपक्षीय शिष्टमंडळांपैकी चार शिष्टमंडळ संबंधित देशांच्या यशस्वी दौऱ्यानंतर भारतात परतले आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज सकाळी नवी दिल्लीत पोहोचलं. खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील बहुपक्षीय शिष्टमंडळ आज दुपारी मायदेशी परतले. खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील संसदीय शिष्टमंडळ सध्या बेल्जियममधील ब्रुसेल्स येथील युरोपियन युनियन मुख्यालयाच्या भेटीवर आहे. काँग्रेस खासदार डॉ. शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकन काँग्रेसचे सदस्य, प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेऊन दहशतवादाविरुद्ध भारताच्या भूमिकेची माहिती दिली.

---------------------------------------------------

पत धोरण

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पत धोरण बैठकीला आज सुरुवात झाली. या बैठकीत रेपो दर कपातीसंदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली, परवा शुक्रवारी या समितीच्या निर्णयाची घोषणा केली जाईल. रिझर्व बँकेनं गेल्या दोन आढाव्यात रेपो दरात ५० बेस पॉईंटनी कपात करत रेपो दर ६ टक्क्यांवर ठेवला आहे.

---------------------------------------------------

जागतिक पर्यावरण दिन

राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिका आणि कृष्णम क्रिएशन नाट्य कलामंच यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सेंटर फॉर सस्टेनेबल डेवलपमेंट

यांच्या सहकार्याने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरूवार ५ जून रोजी 'शहाणपण नको शिकवू' या पथनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे. हे पथनाट्य महाराजबाग प्राणी संग्रहालय येथे दुपारी ४ वाजता सादर केले जाणार आहे. या पथनाट्याचा मुख्य उद्देश पर्यावरणाबाबत समाजात जनजागृती करणे असून, पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व आणि त्यासाठी करावयाचे उपाय यावर या पथनाट्याच्या माध्यमातून प्रकाश टाकला जाणार आहे. एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन (एमआयए)तर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उद्या वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहित राबवणार आहे. सकाळी ९:३० वाजता एमआयए कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून त्यानंतर सेंट झेवियर स्कूल ते पीआयएक्स ट्रान्समिशन फॅक्टरी पर्यंतच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, नागपूर महावितरणने महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना पर्यावरणाच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले आहे. वीज बचत करणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवणे, अनावश्यक कचरा टाकणे टाळणे आणि जास्तीत जास्त झाडे लावणे हे आपले नैतिक कर्तव्य असून ते सर्वांनी पार पाडण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

---------------------------------------------------

प्रधानमंत्री आवास

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणांर महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते काल पुणे इथं प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. शिवराजसिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण झालं. प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्याची घरं पूर्ण करत असताना केंद्राने २० लाख घरकुलांना मंजुरी दिली होती. त्यापैकी १० लाख घरांचा पहिला हप्ता ग्रामविकास विभागाने जमा केला आहे. त्यामुळे एकही लाभार्थी घरापासून वंचित राहणार नाही, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

---------------------------------------------------

देवेंद्र फडणवीस

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया योजनेचा राज्याला मोठा लाभ झाल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते आज मुंबईत बँक ऑफ अमेरिका फ्लॅगशिप इंडिया परिषदेत बोलत होते. महाराष्ट्राची वाटचाल संरक्षण उत्पादन निर्मिती हब

आणि स्टार्ट अप हबच्या दिशेनं सुरु असल्याचं ते म्हणाले. राज्याच्या प्रशासनात डिजीटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करुन जनतेला सुलभता देण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. महानगरांवरील वाढता भार कमी करण्यासाठी टीयर टू, टीयर थ्री शहरं विकसित करण्यात येत आहेत. याच प्रयत्नांचा भाग म्हणून औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरण करुन छत्रपती संभाजीनगर, नांदेड, गडचिरोली ही शहरं विकसित करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

---------------------------------------------------

हवामान

विदर्भातल्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज नागपूरसह भंडारा, गोंदिया स्पर्धा यवतमाळ अमरावती आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या देखील भंडारा आणि गोंदिया वगळता सर्वत्र येलो अलर्ट असणार आहे. यादरम्यान मेघगर्जनेसह वादळाची शक्यता तसेच सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रांना वर्तवली आहे. दरम्यान आज चंद्रपूर इथं 39. 6 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची तर अमरावतीत 21 पूर्णांक तीन अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. नागपुरात 38. 8 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं

---------------------------------------------------

ईशान्य भाग

देशाच्या ईशान्य भागात पावसाचा जोर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याशी संवाद साधून पूर परिस्थितीचा आढावा घेतला. आणि केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. मणिपूरमध्ये आज पावसाचा जोर कमी झाला असून बहुतांश नद्यांचं पाणी उतरलं आहे. आसाममध्ये पूरस्थिती अद्यापही गंभीर असून २१ जिल्ह्यांमधल्या ६ लाख ३० हजारांहून अधिक जणांना पुराचा फटका बसला आहे. सिक्कीममध्ये लाचेन आणि चाटेन इथं अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळं रस्ते संपर्क तुटल्यानं, अडकून पडलेल्या १५० पर्यटकांपैकी ३४ जणांची काल सुटका करण्यात आली. दरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून मदतकार्याचा आढावा घेतला.

---------------------------------------------------

ई-लायब्ररी

नागपूर महानगरपालिकेची लोधीपुरा भागातील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी ई-लायब्ररी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. त्याचबरोबर या ई-लायब्ररीच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना एमबीबीएस, एमडी आणि एमएस सारख्या वैद्यकीय परीक्षांची तयारी करून डॉक्टर बनण्याची संधी मिळत आहे. या लायब्ररीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामुळे ती अल्पावधीतच लोकप्रिय झाली आहे: शांत आणि वातानुकूलित वातावरण,लिफ्ट सुविधा,वीज खंडित झाल्यास जनरेटरची सोय,संगणक कक्ष आणि इंटरनेट, वायफाय सुविधा,दिव्यांगांसाठी विशेष अभ्यासिका आणि संगणक,विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी उपहारगृह, व्याख्यानांसाठी सभागृह, प्रशस्त पार्किंग अशी सुविधा आहे

---------------------------------------------------

समपार फाटक

आंतरराष्ट्रीय समपार फाटक जनजागृती दिन निमित्त, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे आज कलमणा-कोहळी विभागातील LC-289 या समपार फाटकाशी संबंधित ठिकाणी विशेष सुरक्षा जनजागृती मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांना मानवी आणि अमानवीय समपार फाट्यांवर असुरक्षित वर्तनामुळे होणाऱ्या धोका व अपघातांपासून सावध करणे हा होता.

---------------------------------------------------

आत्मनिर्भर भारत पॅकेज

केंद्र शासनाच्यावतीने आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत गेल्या आर्थिक वर्षात प्रकल्प घटक मंजूरीसाठी उत्कृष्ट काम केलेल्या बँक अधिकाऱ्यांचा जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

---------------------------------------------------

पुलोत्सव

ज्येष्ठ साहित्यिक पु.ल. देशपांडे यांचा पंचविसावा स्मृतीदिन आणि सुनिता देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त येत्या ९ ते १२ जून या कालावधीत पुण्यात ग्लोबल पुलोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यंदाचा पुलोत्सव जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ सरोद वादक उस्ताद अमजद अली खान यांना, पु. ल. स्मृती सन्मान ज्येष्ठ रंगकर्मी सई परांजपे यांना, विशेष सन्मान दिवंगत प्रभा अत्रे यांना, तर पु. ल.

**कृतज्ञाता सन्मान चिंतामणी हसबनीस यांना प्रदान केला जाणार आहे. महोत्सवाचे निमंत्रक आणि उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल ही घोषणा केली.**

**-----------------------------------------------------**